लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि. ३ जानेवारी २०१९

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

अणदूर : येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने खुदावाडी येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या समारोप जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

यावेळी सरपंच शरद नरवडे, उपसरपंच पांडुरंग बोंगरगे, शेकाप्पा सालगे, तंटामुक्तीचे अध्यक्ष शिवाप्पा जवळगे, महादेव चिंचोले, पोलीस पाटील बसवेश्वर सांगवे, मुख्याध्यापक चंद्रकांत साखरे, आयुब टिनवाले यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. एम. बी. बिराजदार तर आभार दिपाली बनसोडे यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. जी. टी. राठोड, प्रा. बी. टी. बाराते यांच्यासह विद्यार्थी, ग्रामस्थांनी पुढाकार घेतला.

१५ जानेवारी २०१९

पुण्य नगरी News Line

## सावळसुर येथे रासेयो शिबिरास प्रतिसाद



नारंगवाडी: उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथील एस.एस.पी महाविद्यालयाच्या वतीने सावळसुर येथे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा रविवारी (दि.१३) समारोप करण्यात आला. प्रारंभी प्रा. एस. डी.आगलावे, संस्थेचे सचिव दिलीपराव पवार यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी सरपंच केरुबाई बिराजदार, उपसरपंच तात्या माशाळ, नेताजी पाटील, लक्ष्मीबाई यमगर, चंद्रकांत सुर्यवंशी, चनबस बिराजदार, विठ्ठल चिकुंद्रे उपस्थित होते. कार्यक्रमात दत्तात्रय कांबळे, प्राचार्य व्ही. एम.जाधव, प्रा.पी. एम.शिंदे, डॉ. एन. के. कांबळे, टी. बी. मोरे, एस. बी. सांगवे, एस. व्ही. पाटील, शिवाजी पाटील, सागर वनकुद्रे आदींनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन व्ही.टी. टाळकुटे तर आभार आर.बी. गव्हाणे यांनी मानले.

## इटकळ येथे मतदार जनजागृती

इटकळ दि. ५ फेब्रुवारी

इटकळ व परिसरातील केशेगांव व निलेगाव येथे जागरूक मतदार लोकशाहीचा आधार या संकल्पनेतुन अणदुर येथील



कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थांनी पोवाडा, पथनाट्य, देशभक्तीपर गीत सादर करून मनोरंजनातुन मतदार व लोकशाही जागृत अभियानाच्या माध्यमातून सोमवार दि. ४ फेब्रुवारी रोजी समाज प्रबोधन, अणदुर येथील जवाहर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राज्यशास्त्र इतिहास व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यावतीने लोकशाही संवर्धनासाठी मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. २ फेब्रुवारी पासून या मतदार जनजागृती अभियानास किलज, जळकोट व होर्टी येथून सुरुवात करण्यात आली. इटकळ येथे आठवडे बाजार असल्याने या अभियानास नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. या अभीयानात जवळपास वीस ते बावीस विद्यार्थी व विद्यार्थीनींनी सहभाग घेतला असुन या पथका बरोबर प्रा.डॉ.एम.बी.बिराजदार, प्रा.कंदले प्रसन्न, प्रा.ज्योती हत्तरगे, प्रा.डॉ.दुधभाते हे अभियान यशस्वी करण्यासाठी सहकार्य करीत आहेत. या अभियानाचा समारोप ९ फेब्रुवारी रोजी येणेगुर येथे करण्यात येणार आहे. अणदुर येथील या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी राबवलेल्या या मतदार जनजागृती अभियानाचे कौतुक ग्रामीण परिसरातून केले जात आहे.

दिव्य मराठी, उस्मानाबाद, बुधवार, १६ जानेवारी २०१९

मंथन • अकलूज, लातूरच्या संघांना सांघिक विजेतेपद, तेरणा कॉलेजमध्ये आयोजन

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सुचवले वादविवाद स्पर्धेत दुष्काळावर उपाय

प्रतिनिधी | उस्मानाबाद

शहरातील तेरणा महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आलेल्या बाजीराव पाटील वादविवाद स्पर्धेत विविध विद्यापीठातून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी दुष्काळावर कायमस्वरूपी मात कशी करता येईल, यासंदर्भात विविध उपाययोजना सुचवल्या. तसेच निसर्गाशिवाय दुष्काळाचे निर्मूलन अशक्य असल्याचे मत काही विद्यार्थ्यांनी ठासून मांडले. या स्पर्धेमध्ये अकलूज व लातूर येथील संघाने संयुक्त विजेतेपद पटकावले.

महाविद्यालयांमध्ये दरवर्षीप्रमाणे वाद -विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सातत्याने २१ वर्षांपासून ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. स्पर्धेचे उद्घाटन तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्थ बाळासाहेब वाघ यांच्या हस्ते झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक घोलकर, डॉ. तुळशीराम उकिरडे, डॉ मंजुषा बाबजी, डॉ. अनघा तोडकरी आदी उपस्थित होते. स्पर्धेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, सोलापूर विद्यापीठ अशा नामवंत विद्यापीठातून प्रमुख संघ सहभागी झाले होते. वादविवाद स्पर्धेचा 'दुष्काळावर कायमस्वरूपी मात करणे शक्य आहे किंवा नाही', असा विषय होता. यामध्ये विद्यार्थ्यांनी आक्रमकपणे आपले मत मांडले. बहुतांश विद्यार्थ्यांनी दुष्काळावर मात करणे शक्य असून यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना सुचवल्या आहेत.

विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धन करून दुष्काळावर मात करता येऊ शकते, या सोबतच जलसंवर्धनावर ही भर दिला. यामध्ये पाण्याचे होणारे बाष्पीभवन रोखण्यासाठी विविध प्रकारच्या तेल व रसायनांचा उपयोग कसा करता येतो, हेही सांगितले. तसेच विविध प्रकारचे शेततळे, मोठे जलस्त्रोतांच्या तळ्यातील पाण्याचे बाष्पीभवन रोखता येऊ शकत असल्याचेही विद्यार्थ्यांनी ठासून सांगितले. यासोबतच अनेक विद्यार्थ्यांनी दुष्काळावर मात करणे करता येणे अशक्य असल्याचेही म्हटले. निसर्गाच्या साथीशिवाय दुष्काळ करण्यात आलेल्या युक्तीवादांचे अवलोकन करून विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात्त आली.

**यांच्या हस्ते पारितोषिक वितरण** : विजेत्यांना तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त ॲड. सत्यनारायण दंडनाईक, बाळासाहेब घोलकर यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. परीक्षक म्हणून डॉ. ज्ञानबा गायकवाड, डॉ. उद्धव गंभीरे, प्रा. चेतना जगताप, डॉ. भारत हंडीबाग यांनी काम पाहिले. पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. डी. बी. मोरे

## विविध तीन विद्यापीठांच्या संघांमधून विद्यार्थ्यांचा सहभाग



वादविवाद स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना तेरणा महाविद्यालयात मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

### यांना मिळाली पारितोषिके

अकलूज येथील राजसिंह मोहिते पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट महाविद्यालयाला व लातूर येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयास सांघिक विजेतेपद मिळाले, महाविद्यालयाचे सुमित अभिमान भोसले, गजानन शिरिष दहिहंडे यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. लातूरच्या महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील अमित रामराव कदम यांने दुसरे तर उस्मानाबाद रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील सुजित सुधाकर जमदाडे यांनी तृतीय पारितोषिक पटकावले.

### चौघांना उत्तेजनार्थ

स्पर्धेतील चार स्पर्धकांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले यामध्ये अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील राजश्री धनाजी शिंदे, लोहारा महाविद्यालयातील मोहिनी मोरे, बालाजी चव्हाण, सुमित भोसले यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

लोकमत औरंगाबाद, बुधवार, दि. १६ जानेवारी २०१९ ४

## छायांकित वृत्त...



अखिल भारतीय साहित्य संमेलनात डॉ. अनिता मुदकन्ना यांचा सत्कार करताना राजन लाखे, प्रा.विनोद भगत,डॉ.रमाकांत कोलते, डॉ.श्रीपाद जोशी.

### 'बाभळ' कवितेचा संम्मेलनात सन्मान

अणदूर : येथील जवाहर महाविद्यालयातील माजी प्राचार्या प्रा.डॉ.अनिता मुदकन्ना यांच्या 'बाभळ' या कवितेस यवतमाळ येथे पार पडलेल्या ९२ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनात सन्मानित करण्यात आले. यातील कविता कट्टा येथे प्रा. मुदकन्ना यांनी आपली 'बाभळ' ही कविता केवळ अडीच मिनीटांत कुठलीही प्रस्तावना न देता सादर करून साहित्यप्रेमीची मने जिंकली. त्यामुळे ज्येष्ठ साहित्यिक राजन लाखे, प्रा.विनोद भगत, प्रा.डॉ.रमाकांत कोलते, प्रा.अनंत अट्रावलकर, डॉ.विवेक विश्वरुपे, डॉ.श्रीपाद जोशी यांच्या हस्ते डॉ. अनिता मुदकन्ना यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

लोकमत
औरंगाबाद, शनिवार,
दि. २ फेब्रुवारी २०१९

## मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा

### उमाकांत चनशेट्टी : लोकशाही पंधरवाड्यानिमित्त कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

अणदूर : मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी व जगात अग्रेसर असणारी आपली लोकशाही बळकट करण्यासाठी मतदारांनी जागृत होऊन मतदान करावे, असे आवाहन जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केले.

१ ते १० फेब्रुवारी दरम्यान लोकशाही निवडणूक व सुशासनासाठी 'जागरूक मतदार लोकशाहीचा' यानिमित्ताने लोकशाही पंधरवाडा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. डॉ. चनशेट्टी म्हणाले, महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रीयन लोककलेचा आधार घेऊन पथनाट्य, पोवाडे, भारुड, कव्वाली, एकांकीका, मतदार जागृती करण्यासाठी प्रभातफेरी, मनोरंजनाच्या माध्यमातून लोकशाही जागृती अभियान करणार आहेत. २ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत विविध गावात हे अभियान राबविण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले. यावेळी प्रा. एन. एस. सोमगोंडे, प्रा. एस. एस. रजपूत, प्रा. एफ एस. दुधभाते, प्रा. एस. डी. आगलावे, प्रा. यु. एस. सलगर, प्रा. व्ही.वाहूळे, प्रा. एम. बी. जाधव, प्रा. डी. एन. गटलेवार, प्रा. एम. बी. बिराजदार, प्रा. कंदले आदींची उपस्थिती होती.

तरुण भारत शुक्रवार, १ फेब्रुवारी २०१९

# जवाहर महाविद्यालयातर्फे मतदार जागृती अभियान

**प्राचार्य उमाकांत चनशेट्टी**

**प्रतिनिधी**

**अणदूर, दि. ३१ जानेवारी**

भारतीय संविधातातील ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीस २५ वर्षा पूर्तीनिमित्त येथील जवाहर महाविद्यालयाच्या वतीने तुळजापूर व उमरगा तालुक्यामध्ये १ ते १० फेब्रुवारी या कालावधीमध्ये मतदार जागृती अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी आज आयोजित एका पत्रकार परिषदेमध्ये दिली.

सामाजिक दायित्व म्हणून निघणारे मतदार जागृती अभियान हे तुळजापूर, उमरगा तालुक्यातील ३२ गावामध्ये जाणार असून २ फेब्रुवारी रोजी होर्टी येथे अभियानाचा शुभारंभ करण्यात येणार आहे तर उमरगा तालुक्यातील येणेगुर येथे या अभियानाचा समारोप करण्यात येणार आहे. 'जागरुक मतदार लोकशाहिचा' ही संकल्पना घेवून महाविद्यालयाचे २० विद्यार्थी पोवाडा, पथनाट्य, देशभक्तीपर गीते आदी जनजागृतीचे अभियान राबविण्यात येणार आहे. तर राज्यशास्त्र, इतिहास व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा. डॉ. एन. एस. सोमगोंडे, प्रा. एस. एस. राजपूत, प्रा. एस. डी. आगलावे, प्रा. यु. एस. सलगर, प्रा. व्ही. डब्ल्यु. बिराजदार, प्रा. प्रसन्न वैंदले ही प्राध्यापक मंडळी अभियान यशस्वीतेसाठी प्रयत्न अकरीत असल्याची माहितीही प्राचार्य उमाकांत चनशेट्टी यांनी दिली.

शासन वेगवेगळ्या स्तरावर मतदार जागृती अभियानाअंर्तत लोकशाही पंधरवाडा साजरा करीत असताना जवाहर महाविद्यालयाने यामध्ये झोवून देवून एक अभिनव उपक्रम हाती घेतलेरुज्ञने सामाजिक दायित्व समोर आले आहे.

आदर्श गावकरी
उस्मानाबाद
सोमवार, दि. ४ फेब्रुवारी २०१९ ३

## जळकोट येथे गीते, पथनाट्याद्वारे मतदार जनजागृती

जळकोट / प्रतिनिधी

शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर संचलित जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राज्यशास्त्र इतिहास व राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे जळकोट येथे शनिवारी (दि.२) जागरूक मतदार, सुदृढ लोकशाही ही संकल्पना घेऊन विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, पथनाट्य, पोवाडा सादरीकरणातून मतदारांना जागृत केले.



शिवाजी चौकात पथनाट्य सादरीकरणाचे उद्घाटन तुळजापूर पंस उपसभापती सुनीता पुंडलिकराव कदम यांनी केले. याप्रसंगी भीमाशंकर कदम (वाडीकर), विठ्ठल पट्टेवाले, महेश कारले आदी उपस्थित होते. महाविद्यालयातर्फे २ ते १० फेब्रुवारी दरम्यान विविध गावात हे अभियान राबविण्यात येणार आहे. कार्यक्रमाला प्रा.डॉ.कदम अंकुश, प्रा.डॉ. राठोड गुंडू, प्रा.डॉ. सोमगोंडे, प्रा.डॉ. राजपूत, प्रा.डॉ.दुधभाते, प्रा.डॉ. सलगर, श्रीमती प्रा.डॉ.जाधव, प्रा.डॉ.गटलेवार, प्रा.डॉ.बिराजदार, प्रा.आगलावे, प्रा.वाहुळे, प्रा.कंदले आदी हजर होते.

उस्मानाबाद. मंगळवार, ५ फेब्रुवारी २०१९। ३
दिव्य मराठी

## जळकोटला पथनाट्य, पोवाड्याद्वारे मतदार जागृती

प्रतिनिधी | जळकोट

येथे आठवडी बाजाराच्या दिवशी जवाहर महाविद्यालयाच्या वतीने 'लोकशाही संवर्धनासाठी' मतदार जागृती कार्यक्रम घेण्यात आला. भारतीय संविधानातील ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'जागृत मतदार लोकशाहीचा' ही संकल्पना घेऊन अणदूर येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मनोरंजनातून ग्रामस्थांमध्ये प्रबोधन करण्यात आले. या अभियानाची सुरुवात शनिवारी (दि.०२) जळकोट, होर्टी, किलज येथे करण्यात आली. पोवाडा, पथनाट्य, देशभक्तीपर गीते सादर करणाऱ्या पथकात सुषमा नवगिरे, सरोजा इसाके, दीपाली बनसोडे, मोनाली वाघमारे, दिपाली बिराजदार, विशाखा थोरात या विद्यार्थिनींचा समावेश होता.



जळकोटला आठवडी बाजारात मतदारांमध्ये जागृती करण्यात आली.

# इटकळ येथे मतदार जनजागृती

**इटकळ दि. ५ फेब्रुवारी**

इटकळ व परिसरातील केशेगांव व निलेगाव येथे जागरूक मतदार लोकशाहीचा आधार या संकल्पनेतुन अणदुर येथील



कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थांनी पोवाडा, पथनाट्य, देशभक्तीपर गीत सादर करून मनोरंजनातुन मतदार व लोकशाही जागृत अभियानाच्या माध्यमातून सोमवार दि. ४ फेब्रुवारी रोजी समाज प्रबोधन, अणदुर येथील जवाहर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राज्यशास्त्र इतिहास व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यावतीने लोकशाही संवर्धनासाठी मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. २ फेब्रुवारी पासून या मतदार जनजागृती अभियानास किलज, जळकोट व होर्टी येथून सुरुवात करण्यात आली. इटकळ येथे आठवडे बाजार असल्याने या अभियानास नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. या अभीयानात जवळपास वीस ते बावीस विद्यार्थी व विद्यार्थीनींनी सहभाग घेतला असुन या पथका बरोबर प्रा.डॉ.एम.बी.बिराजदार, प्रा.कंदले प्रसन्न, प्रा.ज्योती हत्तरगे, प्रा.डॉ.दुधभाते हे अभियान यशस्वी करण्यासाठी सहकार्य करीत आहेत. या अभियानाचा समारोप ९ फेब्रुवारी रोजी येणेगुर येथे करण्यात येणार आहे. अणदुर येथील या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी राबवलेल्या या मतदार जनजागृती अभियानाचे कौतुक ग्रामीण परिसरातून केले जात आहे.


औरंगाबाद, शुक्रवार,
१ मार्च २०१९

## जवाहर महाविद्यालयात कार्यक्रम

**अणदूर :** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त येथील जवाहर महाविद्यालयात गुरुवारी (ता. २८) व्यवहारातील वैज्ञानिक घडामोडी व खेळ खेळूया विज्ञानाशी या विषयावर डॉ. होमी भाभा विज्ञान केंद्राचे (मुंबई) प्रा. आनंद घैसास यांनी प्रयोगाद्वारे विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी अध्यक्षस्थानी होते. रेणुका नवगिरे हिने विज्ञानगीत गायिले. श्वेता मेंढापुरे व सुषमा नवगिरे यांची भाषणे झाली.

यावेळी प्रा. सूर्यकांत आगलावे, प्रा. राजशेखर नलगे, संस्थेचे संचालक गोपीनाथ बिच्चे, प्रा. एस. बी. राजमाने यांची उपस्थिती होती. प्रा. एम. बी. बिराजदार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. डी. एन. गटलेवार यांनी आभार मानले.

लोकमत औरंगाबाद, शनिवार, दि. २२ जून २०१९





## जवाहर विद्यालय, अणदूर

अणदूर : येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. सुरुवातीला संस्थापक सि. ना. आलुरे गुरुजी, कोषाध्यक्ष गोपीनाथ बिच्चे यांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करुन योग साधनेची सुरुवात करण्यात आली. यावेळी दीड हजार विद्यार्थी, ११० शिक्षक प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. योगासनांचे विविध प्रात्यक्षिक प्रा. बिराजदार, प्रा. दयानंद आगलावे, प्रवीण गुरव यांनी करुन दाखविले. समालोचन जयहिंद पवार यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक विवेकानंद स्वामी, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्यासह शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

दैनिक सकाळ

औरंगाबाद, शनिवार, २२ जून २०१९ ३



अणदूर : जागतिक योग दिनानिमित्त योगासने करताना जवाहर परिवारातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संस्थेचे पदाधिकारी व ग्रामस्थ.

## जवाहर विद्यालय, अणदूर


अणदूर (बातमीदार) : जागतिक योग दिन जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व जवाहर महाविद्यालयात शुक्रवारी (ता. २१) योगसाधना करून साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव सिद्रामप्पा आलुरे गुरूजी होते. कोषाध्यक्ष गोपीनाथ बिच्चे यांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून योगसाधनेची सुरवात करण्यात आली. त्याप्रसंगी जवाहर विद्यालय, जवाहर उच्च माध्यमिक विद्यालय, जवाहर महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. योगप्रकारांचे प्रात्यक्षिक प्रा. एम. बी. विराजदार, प्रा. सूर्यकांत आगलावे व जयहिंद पवार यांनी केले.

यावेळी मुख्याध्यापक विवेकानंद स्वामी, प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, पालक, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रवीण गुरव यांनी सूत्रसंचालन केले.

संचार सोलापूर, शनिवार २२ जून २०१९

# जागतिक योग दिन साजरा



## जवाहर विद्यालयात योगदिन साजरा

संचार वृत्तसेवा

अणदूर, दि. २१- येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि महाविद्यालयात शुक्रवारी आंतरराष्ट्रीय जागतिक योग दिन साजरा करण्यात आला.

संस्थेचे संस्थापक सि. ना. आलरे गरूजी, कोषाध्यक्ष बिन्ने गुरूजी यांच्या विद्येची देवता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून योगसाधनेची सुरूवात झाली. याप्रसंगी दीड हजार विद्यार्थी व ११० शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी योगशिक्षक प्रा. बिराजदार, आगलावे, प्रवीण गुरव, जयहिंद पवार गुरूजी यांनी प्रशिक्षण दिले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेकानंद स्वामी, प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, पालक, सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रवीण गुरव यांनी केले

उस्मानाबाद. मंगळवार, ३० जुलै, २०१९ दिव्य मराठी

# युवा माहितीदूत ॲपद्वारे विद्यार्थ्यांना योजनांची माहिती

## अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात कार्यक्रम

प्रतिनिधी | अणदूर

उच्च शिक्षण विभाग व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने येथील जवाहर महाविद्यालयात सोमवारी (दि.२९) युवा माहिती दूत कार्यक्रम राबवण्यात आला. या उपक्रमासाठी अनुलोम संस्थेचे सहकार्य लाभले.

याअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मोबाइलवर 'युवा माहितीदूत' हा ॲप इन्स्टॉल करुन देण्यात आला. दुपारी एक वाजता झालेल्या कार्यक्रमात संस्थेचे तुळजापूर विभागप्रमुख बालाजी पाटील यांनी या ॲपचा वापर कसा करायचा याची माहिती यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. तसेच अनुलोमचे अणदूर वस्ती मित्र अंकुश चिनकरे यांनी या ॲपमधून विद्यार्थ्यांनी शासकीय योजना कशा माहिती करुन घ्यायच्या व या योजनांचा कसा फायदा घ्यायचा, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन त्यांच्या विविध शंकांचे निरसन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चनशेट्टी, प्राध्यापक वृंद तसेच १०० हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

# धर्म . समाज . संस्था

दिव्य मराठी उस्मानाबाद. सोमवार, १२ ऑगस्ट २०१९

## शिक्षणासाठी ई कंटेंटचा उपयोग अपरिहार्य

### कुलगुरू डॉ. फडणवीस यांचे मत, जवाहर विद्यालयांत राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन

प्रतिनिधी | अणदूर



आधुनिक काळात शिक्षणासाठी ई कंटेंटचा उपयोग अपरिहार्य असून, विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनीही हे तंत्र आत्मसात करणे गरजेचे असल्याचे मत सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी येथे व्यक्त केले. येथील जवाहर विद्यालयाच्या वतीने हुतात्मा स्मारक सभागृहात आयोजित 'ई कंटेंट डेव्हलपमेंट फॉर लर्निंग रिसोर्सेस' या दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे शुक्रवारी उद्घाटन झाले, यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्राचे माजी संचालक डॉ. अशोक मोहेकर होते तर कुमार स्वामी महाविद्यालय औसाचे प्राचार्य डॉ. एम. एम. बेटकर यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. फडणवीस यांनी संशोधनासाठी ई कंटेंटचा वापर अवश्य करावा असे सांगतानाच त्यात होत असलेल्या कॉपी पेस्ट बद्दल खंत व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी ई लायब्ररीचा वापर करून अधिक ज्ञान संपादन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जवाहरचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी तर संस्था सचिव माजी आमदार सि. ना. आलुरे गुरुजी यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. विश्वास माने यांनी उपस्थित मान्यवरांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन डॉ. मल्लीनाथ बिराजदार यांनी तर डॉ. सहदेव बिराजदार यांनी आभार मानले. या कार्यक्रमास संस्थेचे कोषाध्यक्ष गो. का. बिच्चे, जवाहर विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेकानंद स्वामी, माजी जि. प. सदस्य महादेवपा आलुरे, बालाघाट शिक्षण संस्थेचे संचालक रामचंद्र आलुरे तसेच परिसरातील विविध शाळा व महाविद्यालयातील शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ

## तंत्रज्ञानाने शिक्षणातील विषमता दूर करा

### कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे आवाहन, राष्ट्रीय कार्यशाळा

अणदूर, ता. ११ (बातमीदार) : तंत्रज्ञान हा शिक्षणाचा पासवर्ड असून शिक्षणातील विषमता दूर करण्यासाठी त्याचा वापर कौशल्याने करून संस्कारित पिढ्या घडविण्याचे काम गुरुजनांनी करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे (कोल्हापूर) कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

येथील अणदूर शिक्षण प्रसारक संस्थेच्या षष्ठ्यब्दीनिमित्त जवाहर महाविद्यालयाच्या वतीने ई-कंटेंट डेव्हलपमेंट फॉर लर्निंग रिसोर्सेस या विषयावर शुक्रवारी (ता. नऊ) व शनिवारी (ता. दहा) दोनदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचा समारोप शनिवारी करण्यात आला. त्यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते. प्राचार्य डॉ. दिलीप गरुड अध्यक्षस्थानी होते. या वेळी संस्थेचे सचिव माजी आमदार सिद्रामप्पा आलुरे गुरुजी, प्राचार्य संजय कोरेकर, प्राचार्य बी. आर. कुलकर्णी, जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती.



अणदूर (ता. तुळजापूर) : जवाहर महाविद्यालयाच्या वतीने आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. या वेळी सिद्रामप्पा आलुरे गुरुजी, प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी आदी.

डॉ. शिंदे म्हणाले, की शिक्षण व्यवस्थेचे मूळ साधन हे शिक्षक आहे. त्यांनी काळाची गरज ओळखून व संशोधनात्मक दृष्टिकोन ठेवून मोबाईलचा वापर करून शैक्षणिक साहित्याची निर्मिती करावी, असे मत व्यक्त केले.

यावेळी प्रा. वैशाली कोंडा, प्रा. नागराज खराडे, प्रा. सुधीर गरड, प्रा. डॉ. सुधा बनसोडे, प्रा. शौकत पटेल, श्री. आलुरे गुरुजी, प्राचार्य डॉ. गरुड यांची भाषणे झाली. नॉलेज ब्रिजचे (नगर) श्री. कुलकर्णी व एकनाथ कोरे या तज्ज्ञांनी उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापकांना प्रशिक्षण दिले. प्रा. एस. जी. बिराजदार यांनी अहवाल वाचन केले. प्रा. एम. बी. बिराजदार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विश्वास माने यांनी आभार मानले. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ (नांदेड), अहल्यादेवी होळकर विद्यापीठ (सोलापूर), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ (औरंगाबाद) व कर्नाटक राज्यातील प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला.

Aurangabad, Osmanabad-Today
12/08/2019 Page No. 3


दिव्य मराठी
उस्मानाबाद जिल्हा
उस्मानाबाद. रविवार, १८ ऑगस्ट २०१९ | श्रावण कृ. ३, शके १९४१

# विद्यार्थिनींनी बांधल्या पोलिस दादांना राख्या

प्रतिनिधी | अणदूर

रक्षाबंधनानिमित्त येथील जवाहर महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी गुरुवारी नळदुर्ग पोलिसांना राख्या बांधून औक्षण केले.

येथील प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या प्रेरणेने व प्रा. सत्येंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली संस्कृत विभागाच्या वतीने पोलिस ठाणे नळदुर्ग येथे महाविद्यालयीन विद्यार्थिनी अंबिका घोडके, प्रेरणा कांबळे, अंजली बनसोडे, शिलवंती कोकणे, आशामा मकानदार, ऋचा मुळे यांनी नळदुर्ग पोलिस ठाणे येथील उपस्थित पोलिस बांधवांना राखी बांधून नागरिकांच्या रक्षणासाठी झटणाऱ्या पोलिस दादांना प्रेरणा देतानाच सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. पोलिस बांधव कर्तव्यावर आपल्या कुटुंबापासून दूर असतात. मात्र कुटुंबाप्रमाणे समाजाची काळजी घेतात. त्यांना आपल्या बहिणींची उणीव भासू नये म्हणून जवाहर महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी हा उपक्रम राबवला. यावेळी पोलिस भगिनींकडूनही प्रा. सत्येंद्र राऊत यांना राखी बांधण्यात आली. या प्रसंगी पोलिस उपनिरीक्षक लहाने व पोलिस बंधु उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल सहाय्यक पोलिस निरीक्षक वानखेडे, संस्थेचे सचिव सि. ना. आलुरे गुरुजी व प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी कौतूक केले.



सकाळ
उस्मानाबाद. शनिवार, ३१ ऑगस्ट २०१९

# विद्यार्थ्यांनो, मोबाइलवर गेम खेळण्यापेक्षा मैदानी खेळ खेळा

## प्रा. शिंदे यांचे मार्गदर्शन, सुदृढ भारत अभियानाचा शुभारंभ

प्रतिनिधी | अणदूर

'तुम्ही खेळाडू असाल तर सर्वांच्या स्मरणात रहाल, खेळामुळे आपले शरीर व मन सुदृढ राहते. त्यामुळे फक्त मोबाइलवर गेम न खेळता मैदानावर घाम येईपर्यंत मैदानी खेळ खेळा,' असे प्रा. काकासाहेब शिंदे यांनी सांगितले.

येथील शिक्षण प्रसारक मंडळाद्वारा संचालित जवाहर महाविद्यालयात क्रीडा दिनानिमित्त क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सुदृढ भारत अभियानाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते. प्रमुख पाहुणे म्हणून रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद येथील सेवानिवृत्त क्रीडा विभागप्रमुख प्रा. काकासाहेब शिंदे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्रीडा दिनानिमित्त सुदृढ भारत अभियानासंदर्भात केलेल्या मार्गदर्शनाबद्दलची चित्रफीतही दाखविण्यात आली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी मेजर ध्यानचंद यांच्याबद्दल माहिती देऊन तरुणाई ही बलवान देशाची संपत्ती असल्याचे सांगितले. कार्यक्रमास लक्ष्मीकांत भिसे, प्रा. एस. आर. भारती, रासेयो विभागाचे प्रा. डॉ. जी. टी. राठोड, एस. के. कुलकर्णी यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक रासेयो विभागप्रमुख प्रा. एस. डी. आगलावे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार यांनी आणि क्रीडा विभागप्रमुख प्रा. डॉ. उमेश सलगर यांनी आभार मानले.



अणदूर येथील जवाहर विद्यालयात प्रा. शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

मंगळवार, ३ सप्टेंबर २०१९ तरुण भारत

# अभाविपच्या वतीने व्याख्यानाचा कार्यक्रम



**अणदुर**

**अणदुर दि. २ सप्टेंबर**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, अणदूर शाखा व राष्ट्रीय सेवा योजना (NSS) च्या संयुक्त विद्यमाने जवाहर महाविद्यालयात कलम ३७० व ३५ अ चे अस्तित्व या विषयावर अभाविप पुर्व कार्यकर्ते प्रा. संतोष नरे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. दरम्यान नरे म्हणाले की, जम्मु-काश्मीर व इतर राज्यातील नागरिकांचे हक्क तसेच स्वातंत्र्य सारखेच आहेत, कलम रद्दच्या निर्णया अगोदर अशी स्थिती तिथे नव्हती. आता संपुर्ण भारतातील प्रत्येक व्यक्ती संविधानानुसार भारतात कोठेही (जम्मू-काश्मीरसह) वास्तव्य तसेच महसुल व्यवहार करू शकते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जवाहर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एम. एम. लंगडे, प्रमुख पाहुणे अ.भा.वि.प.चे जिल्हा कार्यालय मंत्री अंकुश चिनकरे उपस्थित होते. श्री चिनकरे म्हणाले की, अभाविप विद्यार्थ्यांना उभं करण्याचं काम करीत असते, विद्यार्थ्यांच्या कॉलेज मधील समस्या असो वा राष्ट्रवाद तेथे विद्यार्थी परिषद नेहमी पुढेच असते. दरम्यान महाविद्यालय विद्यार्थी ओंकार कर्पे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख उपस्थितांच्या स्वागताने करण्यात आली. यावेळी एनसीसी. प्रमुख प्रा. आगलावे, एम. बी. बिराजदार, क्रीडा प्रशिक्षक प्रा. सलगरे, प्राध्यापक वृंद सह अभाविप अणदूर शहरमंत्री निखिल पवार, सहशहर मंत्री ओंकार बिराजदार, प्रसिद्धी प्रमुख प्रशांत सुरवसे, कार्यालय मंत्री मारुती बनसोडे, आंदोलन प्रमुख आप्पाराव घुगरे, संतोष चव्हाण आदी अभाविप कार्यकर्त्यांसह विद्यार्थी-विद्यार्थिनीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सोपान सुरवसे यांनी केले. शेवटी विकी कुंभार यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाचा समारोप केला.

औरंगाबाद, सोमवार, २ सप्टेंबर २०१९ दैनिक दिव्य मराठी

# जवाहर महाविद्यालयात व्याख्यान

**अणदूर :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने शनिवारी (ता.३१) येथील जवाहर महाविद्यालयात कलम ३७० व ३५ अ चे अस्तित्व या विषयावर प्रा. संतोष नरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. उपप्राचार्य डॉ. एम. एम. लंगडे अध्यक्षस्थानी होते. यावेळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे जिल्हा कार्यालय मंत्री अंकुश चिनकरे उपस्थित होते. यावेळी श्री. चिनकरे, ओंकार करपे यांची भाषणे झाली. सोपान सुरवसे यांनी सूत्रसंचालन केले. विकी कुंभार यांनी आभार मानले. राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. सूर्यकांत आगलावे, प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार, प्रा. उमेश सलगर, विद्यार्थी परिषदेचे शहरमंत्री निखिल पवार, ओंकार बिराजदार, प्रसिद्धिप्रमुख प्रशांत सुरवसे, कार्यालय मंत्री मारुती बनसोडे, आंदोलनप्रमुख आप्पाराव घुगरे, संतोष चव्हाण यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै. दिव्य मराठी.
दि. 15.09.2019



अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात हिंदी विषयाच्या शिक्षकांचा सत्कार झाला.

# जवाहर महाविद्यालयात हिंदी साहित्याची माहिती

**अणदूर ।** येथील जवाहर महाविद्यालयात हिंदी दिन साजरा साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सत्येंद्र राऊत होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. आशा कडेकर यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. छाया कडेकर यांनी हिंदी भाषा ही राजभाषा असून तिचे जतन केले पाहिजे असे मत व्यक्त केले तर अध्यक्षीय भाषणात प्रा. सत्येंद्र राऊत यांनी, 'हिंदी एकता की जान है, हिंदी देश की शान है, मेरा मान है हिंदी, मेरी शान है हिंदी, हिंदी हमारी प्यारी राष्ट्रभाषा है', हिंदी देशाला एका सूत्रात बांधणारी भाषा आहे, हिंदी भाषा दैनंदिन जीवनात विविध माध्यमातून ऐकतो व याच राष्ट्रभाषेचा वापर व्यवहारात केला पाहिजे असे सांगितले. तसेच हिंदी भाषेचा उगम, हिंदी साहित्यिक व त्यांच्या रचनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच हिंदी भाषेवर प्रेम करणारी स्वरचित कविताही सादर केली. यावेळी प्रा. मल्लिनाथ बिराजदार यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मीना जाधव यांनी तर कु. प्रेरणा कांबळे हिने आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. आशामा मकानदार यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

तात्याराव फडताळे यांनी सूत्रसंचालन केले. कुलकर्णी यांनी आभार मानले.

उस्मानाबाद, बुधवार, दिनांक २५ सप्टेंबर २०१९ एकमत

# राष्ट्र सेवेसाठी मन, मनगट, मेंदू मजबूत करा : डॉ. कोरेकर



नळदुर्ग : राष्ट्रीय सेवा योजनेतच सेवा हा शब्द आला आहे. राष्ट्राची सेवा करण्यासाठी आपले मन, मनगट आणि मेंदू मजबूत करा, आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी एक-एक गुण वेचता आला पाहिजे. जोपर्यंत आपण संघटित होत नाही. तोपर्यंत सुधारणा होऊन ग्रामीण भागाची सेवा करूया. असे मत नळदुर्ग येथील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कोरेकर यांनी केले. ते अणदूर येथे जवाहर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशट्टी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून एनएसएस विभाग प्रमुख तथा जिल्हा समन्वयक प्रा. एस. डी. आगलावे, प्रा. डॉ. राठोड जी. टी. यांची उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य डॉ. चनशट्टी म्हणाले, जोपर्यंत तुम्ही स्वतःशीच स्पर्धा करत नाही, तोपर्यंत जीवनात परिवर्तन होत नाही. परिवर्तनाने राष्ट्र मोठे होते. आणि हे परिवर्तन करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना या माध्यमातून हे साध्य करण्याची संधी महाविद्यालयीन युवकांना मिळाली आहे. यावेळी विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु. स्नेहा शिंदे , कु. प्रेरणा कांबळे, आशामा मकानदार यांनीही मनोगतातून शिबिराच्या माध्यमातून आलेले अनुभव व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एस. डी. आगलावे यांनी केले. सूत्रसंचलन चैतन्य भंडारकवठे याने तर आभार ओंकार मोकाशे याने मानले. यावेळी ओंकार मोकाशे या विद्यार्थ्यांची एनएसएस प्रतिनिधी म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील डॉ. सुनील राजपूत, प्रा. प्रसन्न कंदले, डॉ. राजशेखर वरशेट्टी, डॉ. मलिनाथ बिराजदार यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक दिव्य मराठी उस्मानाबाद. शुक्रवार, २० सप्टेंबर, २०१९ |

# प्राचार्यांसह विद्यार्थ्यांचा नेत्रदानाचा संकल्प, प्राध्यापक करणार देहदान

## जवाहर महाविद्यालयाच्या प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी घातला आदर्श

प्रतिनिधी | अणदूर



प्राध्यापक सुरेखा भारती यांनी संकल्पपत्र भरून दिले.

येथील जवाहर महाविद्यालयातील प्राध्यापक सुरेखा भारती यांनी मुक्तिसंग्रामदिनी मरणोत्तर देहदान तर प्राचार्य उमाकांत चनशेट्टी यांच्यासह ४६ विद्यार्थ्यांनी नेत्रदानाचा संकल्प केला आहे.

मंगळवारी (दि.१७) मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून येथील नेत्र चिकित्सा अधिकारी डॉ. सी. एस. महिंद्रकर यांनी मरणोत्तर देहदान व नेत्र दानाचे महत्त्व पटवून देत सविस्तर चर्चा केली असता त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्राचार्य उमाकांत चनशेट्टी तसेच ४६ महाविद्यालयीन तरुणांनी नेत्रदानाचे संकल्प पत्र भरून दिले. विशेषतः यात ४० विद्यार्थिनींचा सहभाग आहे. यावेळी संस्कृत विषयाच्या प्राध्यापिका सुरेखा भारती यांनी देहदानाचे संकल्प पत्र भरून दिले. काळाची गरज व महत्व ओळखून समाजासमोर आदर्श ठेवलेल्या या निर्णयाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

दै. संचार

सोलापूर, मंगळवार, १७ सप्टेंबर २०१९

# जवाहर महाविद्यालयात हिंदी साहित्याची माहिती

अणदूर, दि. १६- येथील जवाहर महाविद्यालयात हिंदी दिन साजरा साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सत्येंद्र राऊत होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. आशा कडेकर यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. छाया कडेकर यांनी हिंदी भाषा ही राजभाषा असून तिचे जतन केले पाहिजे असे मत व्यक्त केले तर अध्यक्षीय भाषणात प्रा. सत्येंद्र राऊत यांनी, 'हिंदी एकता की जान है, हिंदी देश की शान है, मेरा मान है हिंदी, मेरी शान है हिंदी, हिंदी हमारी प्यारी राष्ट्रभाषा है', हिंदी देशाला एका सूत्रात बांधणारी भाषा आहे, हिंदी भाषा दैनंदिन जीवनात विविध माध्यमातून ऐकतो व याच राष्ट्रभाषेचा वापर व्यवहारात केला पाहिजे असे सांगितले. तसेच हिंदी भाषेचा उगम, हिंदी साहित्यिक व त्यांच्या रचनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच हिंदी भाषेवर प्रेम करणारी स्वरचित कविताही सादर केली. यावेळी प्रा. मल्लिनाथ बिराजदार यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मीना जाधव यांनी तर प्रेरणा कांबळे हिने आभार मानले. सूत्रसंचालन आशामा मकानदार यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

शुक्रवार, २७ सप्टेंबर २०१९ सकाळ

# ग्रामीण भागातील युवकांनी अभिनय क्षेत्रातही यावे : हर्डीकर

**अणदूर, ता. २६ (बातमीदार)** : आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम नाटकाच्या माध्यमातून होते. स्वतःवर विश्वास ठेवा म्हणजे जीवनाला अर्थ प्राप्त होईल. ग्रामीण भागातील युवकांनी अभ्यासासोबतच नाट्य अभिनयातूनही पुढे यावे, असे आवाहन थिएटर अकादमीचे (कोल्हापूर) मुख्य प्रशिक्षक संजय हर्डीकर यांनी केले.



**अणदूर : संजय हर्डीकर यांचे स्वागत करताना प्रा. मल्लीनाथ लंगडे, प्रा. उमाकांत सलगर आदी.**

येथील जवाहर महाविद्यालयात १७ ते२० सप्टेंबर या कालावधीत नाट्य अभिनय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी श्री. हर्डीकर बोलत होते. कार्यशाळेचे उद्घाटन जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेमध्ये संजय हर्डीकर यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अभिनयाचे धडे दिले. त्याचबरोबर अभिनयाच्या क्षेत्रात वेगवेगळे अभिनय कशा प्रकारे केले जातात, याची प्रात्यक्षिकेही करून दाखविली. वेगवेगळ्या भावभावना क्रोध, दुःख आणि हास्य यांत होणारे बदल विद्यार्थ्यांकडून करून घेतले. कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा. डॉ. मल्लीनाथ बिराजदार आणि डॉ. उमाकांत सलगर यांनी काम पाहिले. प्रा. प्रसन्न कंदले, प्रा. डॉ. मीना जाधव यांचेही या कार्यशाळेसाठी सहकार्य लाभले. यावेळी स्नेहा शिंदे, अंजली बनसोडे, सुषमा नवगिरे, जयश्री शिंदे, रवी निर्मळे, संतोष चव्हाण, ओंकार करपे या विद्यार्थ्यांची भाषणे झाली.

दैनिक जनसत्य
नि:पक्ष नजर..., नि:पक्ष खबर...
Email : jansatya2013@gmail.com


# जवाहर महाविद्यालयात क्रिएटीव्ह इंग्लीश क्लबचे उदघाटन



नळदुर्ग (प्रतिनिधी) : तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात क्रिएटीव्ह इंग्लिश क्लबचे उदघाटन ३० सप्टेंबर रोजी करण्यात आले . यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जावळे पाटील महाविद्यालय लोहरा येथील डॉ.मनोज सोमवंशी हे उपस्थित होते.यावेळी सोमवंशी यांचे 'ग्लोबल बिझनेस फाउंडेशन स्किल्स' या विषयावर व्याख्यान झाले.यावेळी बोलताना त्यांनी जागतिक पातळीवर व्यवसाय करताना संवाद कौशल्य किती महत्वाचे आहे याची माहिती सांगितली व विद्यार्थ्यांनी हि कौशल्ये कशी आत्मसात करावे याची माहिती दिली.प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांनी विद्यर्थ्यांना दररोज नवीन शब्द शिकण्याचे आवाहन केले ज्यामुळे वर्षभरात तीन हजार सहाशे नवीन शब्द आपल्या शब्द साठ्यात वाढतील व त्यामुळे आपण जगात कुठेही कमी पडणार नाही. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंग्लिश विभाग प्रमुख डॉ.अनिता मुदकण्णा यांनी केले, तर प्रा.विवेकानंद वाहुळे यांनी उपस्थित पाहुण्यांची ओळख करून दिली तर डॉ.मानसी स्वामी उर्फ रुद्रा हिरेमठ यांनी आभार मानले,कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अनुष्का मनशेट्टी या विद्यर्थिनीने केले. कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

बुधवार, २५ सप्टेंबर २०१९ | लातूर | पुण्यनगरी


## जवाहर विद्यालयात सेवा योजना दिन उत्साहात



अणदुर: तुळजापूर तालुक्यातील अणदुर येथील जवाहर महाविद्यालयात मंगळवारी (दि.२४) राष्ट्रीय सेवा योजना दिन विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, प्राचार्य डॉ. संजय कोरेकर, प्रा. एस. डी. आगलावे, प्रा. डॉ. जी.टी.राठोड आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात स्नेहा शिंदे, प्रेरणा कांबळे, आशामा मकानदार आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. एस.डी. आगलावे यांनी, सूत्रसंचलन चैतन्य भंडारकवठे तर आभार ओंकार मोकाशे याने मानले. यावेळी ओंकार मोकाशे या विद्यार्थ्यांची एनएसएस प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आले. यावेळी डॉ. सुनील राजपूत, प्रा. प्रसन्न कंदले, डॉ. राजशेखर वरशेट्टी, डॉ. मलिनाथ बिराजदार उपस्थित होते.

बुधवार, २५ सप्टेंबर २०१९ | लातूर | पुण्यनगरी

जवाहर विद्यालयात सेवा योजना दिन उत्साहात



अणदुर: तुळजापूर तालुक्यातील अणदुर येथील जवाहर महाविद्यालयात मंगळवारी (दि.२४) राष्ट्रीय सेवा योजना दिन विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, प्राचार्य डॉ. संजय कोरेकर, प्रा. एस. डी. आगलावे, प्रा. डॉ. जी.टी.राठोड आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात स्नेहा शिंदे, प्रेरणा कांबळे, आशामा मकानदार आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. एस.डी. आगलावे यांनी, सूत्रसंचलन चैतन्य भंडारकवठे तर आभार ओंकार मोकाशे याने मानले. यावेळी ओंकार मोकाशे या विद्यार्थ्यांची एनएसएस प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आले. यावेळी डॉ. सुनील राजपूत, प्रा. प्रसन्न कंदले, डॉ. राजशेखर वरशेट्टी, डॉ. मलिनाथ बिराजदार उपस्थित होते.

लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि. १ ऑक्टोबर २०१९

# जवाहर महाविद्यालयात विज्ञान मंडळाची स्थापना

लोकमत न्यूज नेटवर्क

अणदूर : येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. एन. एस. धर्माधिकारी यांच्या हस्ते विज्ञान मंडळाचे उद्घाटन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी हे होते. विज्ञान मंडळाचे प्रमुख प्रा. डॉ. डी. एस. सूर्यवंशी, प्रा. एम. एन. गडसिंग, प्रा. डॉ. ए. एम. पाचपिंडे, प्रा. डॉ. मलिनाथ लंगडे, प्रा. डॉ. विश्वास माने, डॉ. एम. टी. मुसांडे, डॉ. एस. कांबळे, प्रा. डॉ. एस. एस. बाड, प्रा. डॉ. जी. टी. राठोड, प्रा. सत्येंद्र राऊत, प्रकाश भुरे, प्रा. सोनाली जाधव, प्रा.चंद्रकांत जाधव, प्रा. नीता राजमाने, प्रा. चव्हाण, प्रा. पाटील, प्रा. एस. ए. वाकळे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेश्मा गायकवाड या विद्यार्थिनीने केले.



विज्ञान मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. एन. एस. धर्माधिकारी व अन्य.

दैनिक भास्कर समूहाचे वृत्तपत्र
दिव्य मराठी
उस्मानाबाद. मंगळवार, १ ऑक्टोबर २०१९

# ज्ञान विज्ञान आत्मसात करून जगण्याचे कौशल्य शोधा

## प्राचार्य डॉ. चनशेट्टी यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

प्रतिनिधी | अणदूर

येथील जवाहर महाविद्यालयात आयोजित विशेष चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य उमाकांत चनशेट्टी होते. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. चनशेट्टी म्हणाले की, गांधीजींचा स्वावलंबनाचा मंत्र विद्यार्थ्यांमध्ये उतरले पाहिजे. ज्ञान विज्ञान आत्मसात करून जीवन जगण्याचे कौशल्य शोधा, जीवनाला दिशा द्या, विज्ञानाच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा दूर करुन विवेक व विचारांचा समाजात संचार करण्याचे कार्य विद्यार्थ्यांनी करावे.

यावेळी शिक्षण तज्ज्ञ डॉ. एन. एस. धर्माधिकारी यांच्या हस्ते विज्ञान मंडळाचे उद्घाटन झाले. यावेळी धर्माधिकारी यांनी दृष्टी असेल तर सृष्टी दिसेल, मोबाइलवर गेम्स खेळून जीवन घडणार नाही. तर चांगले ॲप्स डाऊनलोड करून घ्या, नवीन विज्ञान जाणून घ्या, असे आवाहन केले. यावेळी, विज्ञान मंडळाचे प्रमुख प्रा. डॉ. डी. एस.सूर्यवंशी, प्रा.एम. एन. गडसिंग, प्रा. डॉ. ए. एम. पाचपिंडे, प्रा. डॉ. मल्लिनाथ लंगडे, प्रा. डॉ. विश्वास माने, डॉ. एम. टि.मुसांडे, डॉ. एस. कांबळे, प्रा. डॉ. एस. एस. बाड, प्रा. डॉ. राठोड जी. टी., प्रा.सत्येंद्र राऊत, प्रकाश भुरे, प्रा.सोनाली जाधव, प्रा. चंद्रकांत जाधव, प्रा.नीता राजमाने, प्रा. चव्हाण, प्रा.पाटील, प्रा.एस.ए. वाकळे यांची उपस्थिती होती. त्याचबरोबर, विज्ञान निसर्ग मंडळाचे पदाधिकारी अंजली बनसोडे, प्रसाद काळे, स्नेहा शिंदे, मुर्षद दाऊद,रोहन वर्दे, रेश्मा गायकवाड यांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.चैताली माशाळकर या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय रेश्मा गायकवाड या विद्यार्थिनीने करून दिला. कार्यक्रमात प्रा. डॉ. अमोल पाचपिंडे यांनी आभार मानले.

उस्मानाबाद
मंगळवार, १ ऑक्टोबर २०१९

# जवाहर महाविद्यालयात 'नॅक' कार्यशाळा उत्साहात



शिक्षणतज्ज्ञ डॉ. एन. एस. धर्माधिकारी यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

**प्रतिनिधी** | अणदूर

येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचालित जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळा झाली. तसेच चर्चासत्रासह विज्ञान मंडळाची स्थापना करण्यात आली.

पुणे येथील शिक्षणतज्ञ डॉ. एन. एस. धर्माधिकारी यांनी उपस्थित राहुन मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव, शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरुजी होते. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. धर्माधिकारी म्हणाले की, 'नॅक' म्हणजे सापशिडी आहे. विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य आणि संस्थेत समन्वय ठेवा, स्मार्ट व्हा, विद्यार्थ्यांना वर्गाबाहेरचही शिक्षण द्या. सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, आर्थिक, राजकीय, पर्यावरण, जीएसटी, आर्थिक मंदी, ३७०, ३५ ए आदींबद्दल आवड निर्माण करून अभ्यास, वाचन, चिंतन, मनन करायला सांगा. गुगल क्लासरूम, क्यू.आर.कोड बाबत सविस्तर माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात आलुरे गुरुजी यांनी शिक्षणातून माणूस घडला पाहिजे अशी भावना व्यक्त केली. या कार्यशाळेत प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.मान्यवरांचे स्वागत प्रा. डॉ. विश्वास माने यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार यांनी मानले.

सकाळ उस्मानाबाद
मंगळवार, १ ऑक्टोबर २०१९

## विज्ञान मंडळाचे उद्‌घाटन

अणदूर : येथील जवाहर महाविद्यालयातील विज्ञान मंडळाचे उद्‌घाटन शिक्षणतज्ज्ञ डॉ. एन. एस. धर्माधिकारी यांच्या हस्ते शनिवारी (ता. २८) करण्यात आले. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी अध्यक्षस्थानी होते. या वेळी विज्ञान मंडळाचे प्रमुख प्रा. डॉ. डी. एस. सूर्यवंशी, प्रा. श्रीमती गडसिंग, प्रा. डॉ. ए. एम. पाचपिंडे, प्रा. डॉ. मल्लिनाथ लंगडे, प्रा. डॉ. विश्वास माने, डॉ. एम. टी. मुसांडे, प्रा. डॉ. एस. एस. बाड, प्रा. डॉ. जी. टी. राठोड, प्रा. सत्येंद्र राऊत, प्रकाश भुरे, प्रा. सोनाली जाधव, प्रा. चंद्रकांत जाधव, प्रा. निता राजमाने, प्रा. एस. ए. वाकळे यांची प्रमुख उपस्थिती होती. विज्ञान निसर्ग मंडळाचे पदाधिकारी अंजली बनसोडे, प्रसाद काळे, स्नेहा शिंदे, मुर्शद दाऊद, रोहन वर्दे, रेश्मा गायकवाड उपस्थित होते. या वेळी प्राचार्य डॉ. चनशेट्टी, चैताली माशाळकर यांची भाषणे झाली. रेश्मा गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. पाचपिंडे यांनी आभार मानले.

धाराशिव तरुण भारत
शनिवार, दि. ५ ऑक्टोबर २०१९

## जवाहर महाविद्यालयात क्रिएटीव्ह इंग्लीश क्लबचे उद्‌घाटन



वार्ताहर
अणदूर दि. ४ ऑक्टोबर

अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात क्रिएटीव्ह इंग्लिश क्लबचे उदघाटन करण्यात आले यावेळी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी अध्यक्ष म्हणून तर जावळे पाटील महाविद्यालय लोहरा येथील डॉ. मनोज सोमवंशी हे प्रमुख अतिथी म्हणून मंचावर उपस्थित होते.

यावेळी सोमवंशी यांचे ग्लोबल बिझनेस फाऊंडेशन स्किल्स या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी त्यांनी जागतिक पातळीवर व्यवसाय करताना संवाद कौश्यल्य किती महत्वाचे आहे याची माहिती सांगितली व विद्यार्थ्यांनी हि कौशल्ये कशी आत्मसात करावे याची माहिती दिली. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना दररोज नवीन शब्द शिकण्याचे आवाहन केले ज्यामुळे वर्षभरात तीन हजार सहाशे नवीन शब्द आपल्या शब्द साठ्यात वाढतील व त्यामुळे आपण जगात कुठेही कमी पडणार नाही. इंग्लिश विभाग प्रमुख डॉ. अनिता मुदकण्णा यांनी प्रास्ताविक केले, प्रा.विवेकानंद वाहुळे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली तर डॉ.मानसी स्वामी उर्फ रुद्रा हिरेमठ यांनी आभार मानले,कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अनुष्का मनशेट्टी या विद्यार्थिनीने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि. २१ नोव्हेंबर २०१९

# थोरा-मोठ्यांचे विचार आत्मसात करावेत : पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क



अणदूर येथे इंदिरा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना नानासाहेब पाटील. व्यासपीठावर सि. ना. आलुरे गुरुजी, प्राचार्य प्रा. डॉ. उमाकांत चन्नशेट्टी, नीलकंठ नरे, बाबूराव कुलकर्णी, विवेकानंद स्वामी आदी.

अणदूर : स्वावलंबनाशिवाय स्वाभिमानाने जगणे अशक्य आहे. विद्यार्थ्यांनी थोरा-मोठ्यांचे विचार आत्मसात करावे, आपला वेळ नाहक कामात न घालता पुस्तक वाचण्यात घालवावा, असे मत उस्मानाबाद येथील माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील यांनी व्यक्त केले.

येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य विभागाच्या राष्ट्रीय सेवायोजना कार्यक्रमांतर्गत इंदिरा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सि. ना. आलुरे गुरुजी तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक नीलकंठ नरे, बाबूराव कुलकर्णी, जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. उमाकांत चन्नशेट्टी, मुख्याध्यापक विवेकानंद स्वामी उपस्थित होते. याच कार्यक्रमात सि. ना. आलुरे गुरुजी यांनी इंदिरा गांधी यांचे जीवनकार्य सांगितले. सूत्रसंचालन प्रा. एम. बी. बिराजदार यांनी तर प्रास्ताविक जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. उमाकांत चन्नशेट्टी यांनी केले. आभार प्रवीण गुरव यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. उमेश सलगर, प्रा. सूर्यकांत आगलावे, प्रा. मल्लीनाथ लंगडे, प्रा. विवेकानंद वाहुळे, प्रा. धनंजय गटलेवार, प्रा. एस. व्ही. राजमाने आदींनी पुढाकार घेतला.

पुरोगामी विचाराचे एकमत
उस्मानाबाद : मंगळवार, दिनांक ०३ डिसेंबर २०१९

# प्रा. राऊत यांना महात्मा गांधी दर्शन पुरस्कार



अणदूर : येथील जवाहर महाविद्यालयातील प्रा. सत्येंद्र राऊत यांना रविवारी (दि.१) आनंदश्री ऑर्गनाईजेशनेच्यावतीने सामाजिक, साहित्यिक व मानवाधिकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महात्मा गांधी दर्शन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. लक्ष्मण गोळे, डॉ. रोहिदास वाघमारे, प्रा.दिनेश गुप्ता या मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. प्रा. राऊत एक उत्तम कवी, लेखक व अभिनेता असून त्यांचे साहित्य विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातही आहे. आजपर्यंत राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील शंभरापेक्षाही अधिक पुरस्कार मिळाले आहेत. पुरस्काराबद्दल संस्थेचे सचिव सि.ना.आलुरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, आर्यन राऊत, महादेव राऊत, दीपमाला खडके, सुप्रिया दापके यांनी अभिनंदन केले.

दिव्य मराठी
सोलापूर, मंगळवार, ३ डिसेंबर २०१९

# प्रा. राऊत गांधी दर्शन पुरस्काराने सन्मानित



अणदूर । येथील जवाहर महाविद्यालयातील प्रा. सत्येंद्र राऊत यांना आनंदश्री ऑर्गनायझेशनच्या वतीने 'महात्मा गांधी दर्शन' पुरस्काराने सन्मानित केले.

डोंबिवली येथील श्री वरद गणेश मंदिर संस्थेच्या सभागृहात रविवारी (दि.१) कार्यक्रमात सामाजिक, साहित्यिक व मानवाधिकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी प्रा. सत्येंद्र राऊत यांना गांधी विचारवंत लक्ष्मण गोळे, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रोहिदास वाघमारे व प्रो. दिनेश गुप्ता या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. राऊत एक उत्तम कवी, लेखक व अभिनेता असून त्यांचे साहित्य विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातही समाविष्ट आहे. नुकतेच त्यांनी केज येथे राज्यस्तरीय प्रेम काव्यमहोत्सव आयोजित करुन अनेक कवींना पुरस्कृत केले आहे. संस्थेचे सचिव सि. ना. आलुरे गुरुजी, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, शहर पत्रकार संघाचे मार्गदर्शक राजेंद्र स्वामी तसेच आर्यन राऊत, महादेव राऊत, दीपमाला खडके, सुप्रिया दापके यांनी अभिनंदन केले.

दै. सकाळ

बुधवार, २० नोव्हेंबर २०१९ ३



अणदूर (ता. तुळजापूर) : जवाहर महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना नानासाहेब पाटील. यावेळी माजी आमदार आलुरे गुरुजी, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी.

# जवाहर महाविद्यालयात कार्यक्रम

**अणदूर :** माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त जवाहर महाविद्यालय व जवाहर विद्यालयाच्या वतीने मंगळवारी (ता. १९) कार्यक्रम घेण्यात आला. उस्मानाबादचे माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. माजी आमदार सिद्रामप्पा आलुरे गुरुजी अध्यक्षस्थानी होते. यावेळी श्री. पाटील यांनी इंदिरा गांधी यांचे जीवनकार्यावर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, मुख्याध्यापक विवेकानंद स्वामी, बाबूराव कुलकर्णी, नीलकंठप्पा नरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार यांनी सूत्रसंचालन केले. प्रवीण गुरव यांनी आभार मानले. यावेळी गावातील नागरिक विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

दैनिक दिव्य मराठी
उस्मानाबाद जिल्हा
उस्मानाबाद. शुक्रवार, १३ डिसेंबर २०१९ | मार्गशीर्ष कृ.१, शके १९४१

# विद्यार्थ्यांनो, शिक्षण, संस्कार, आरोग्य यासह मानवी मूल्यांचे जतन करा!

**अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात आनंद पुरुषार्थी यांचे मार्गदर्शन**

प्रतिनिधी | अणदूर

विद्यार्थ्यांनी शिक्षण, संस्कार व आरोग्यासह मानवी मूल्यांची जोपासना करावी, असे प्रबोधन आचार्य आनंद पुरुषार्थी यांनी येथे केले.

येथील जवाहर महाविद्यालयात संस्कृत विभागाच्या वतीने मानव निर्माण अभियानांतर्गत कार्यक्रम घेण्यात आला, यावेळी पुरुषार्थी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते. प्रतिपसिंह चौहान व सोनाजू घुन्नर यांची प्रमुख उपस्थिती होती. आचार्य आनंद पुरुषार्थी म्हणाले की, आज समाजात एकता, समता, सहिष्णुता, संस्कार व आरोग्याचे महत्त्व जपले पाहिजे. या मूल्यांची आज समाजाला नितांत आवश्यकता आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुरेखा भारती यांनी तर प्रा. सत्येंद्र राऊत यांनी आभार मानले. या कार्यक्रमास डॉ. मीना जाधव, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

---

द : बुधवार, दिनांक ११ डिसेंबर २०१९
एक
epaper
www.dainikekmat.com
१०

# आज जवाहर महाविद्यालयात रसायनशास्त्र विषयावर चर्चासत्र

**अणदूर :** येथील शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर रसायनशास्त्र विभागाच्यावतीने आज (दि.११) इमर्जिंग ट्रेंड्स इन केमिस्ट्री: स्कोपे अँड फ्युचर या विषयावर विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रात थोर शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश वडगावकर एन.सी.एल., पुणे तसेच तज्ञ प्रा. डॉ. अजित फडकुले संगमेश्वर कॉलेज, सोलापूर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे .तसेच टेक्नॉलॉजीच्या ज्योती तरंगे या विद्यार्थ्यांना इन प्लांट ट्रेनिंग व इंडस्ट्रियल प्लेसमेंट या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.विविध महाविद्यालयातील विद्यार्थी या कार्यशाळेत सहभागी होणार आहेत. परिसरातील रसायनशास्त्र विषयाच्या पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी चर्चा सत्रास सहभागी व्हावे, हे असे आवाहन जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले आहे.

मानाबाद, गुरुवार, दिनांक १२ डिसेंबर २०१९

# विद्यार्थ्यांनो शिक्षण, आरोग्य जतन करा : पुरुषार्थी



**अणदूर** : शिक्षण, संस्कार व आरोग्यासह मानवीय मूल्यांची जोपासना करण्याचा संदेश विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय वैदिक प्रवक्ता आचार्य आनंद पुरुषार्थी यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात दिला. जवाहर महाविद्यालयात संस्कृत विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मानव निर्माण अभियान या कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी अध्यक्षस्थानी होते तर प्रतापसिंह चौहान व सोनाजु घुन्नर यांची प्रमुख उपस्थिती होती. आचार्य आनंद पुरुषार्थी म्हणाले, आज समाजात एकता, समता, सहिष्णुता, संस्कार व आरोग्याचे महत्व जपले पाहिजे. या सर्वबाबीची आज समाजाला नितांत आवश्यकता आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुरेखा भारती यांनी केले.प्रा. सत्येंद्र राऊत यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाला डॉ. मीना जाधव, बिराजदार, आगलावे व बहुसंख्येने प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ

बुधवार,
११ डिसेंबर २०१९ ४

## रसायनशास्त्र विभागातर्फे चर्चासत्र

अणदूर, ता. १० (बातमीदार) : येथील शिक्षणप्रसारक मंडळ संस्थेच्या षष्ट्यब्दी वर्षानिमित्त होणाऱ्या विविध कार्यक्रमाअंतर्गत रसायनशास्त्र विभागाच्या वतीने बुधवारी (ता. ११) इमर्जिंग ट्रेंड्स इन केमिस्ट्री : स्कोपेन्ड फ्युचर या विषयावर विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. यात शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश वडगावकर (एनसीएल, पुणे), प्रा. डॉ. अजित फडकुले (संगमेश्वर कॉलेज, सोलापूर) यांची प्रमुख उपस्थिती असेल. टेक्नॉलॉजीच्या ज्योती तरंगे या विद्यार्थ्यांना इन प्लांट ट्रेनिंग व इंडस्ट्रियल प्लेसमेंट या विषयावर मार्गदर्शन करतील. सहभागी होण्यासाठी जवाहर महाविद्यालयातील प्रा. डॉ. ए. एम. पाचपिंडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले आहे.

उस्मानाबाद पुण्य

## साहित्य संमेलनात 'कवी कट्टा' साठी राऊत दांम्पत्याची निवड





उस्मानाबाद: येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कवी कट्ट्यावर कविता सादर करण्यासाठी अणदूर (ता. तुळजापूर) येथील प्रा. सत्येंद्र राऊत यांच्या 'नारीशक्ती' तर त्यांच्या पत्नी दीपमाला खडके यांच्या 'माय मराठी' या कवितेची निवड झाली आहे. अणदूर येथे जवाहर महाविद्यालयातील प्रा. सत्येंद्र राऊत हे संस्कृत विषयाचे विभागप्रमुख असून त्यांनी राज्यस्तरीय पाच प्रातिनिधिक काव्यसंग्रह संपादित केले. तसेच उत्कृष्ट कवी, साहित्यिक व अभिनेताही आहेत. त्यांना शंभरपेक्षाही अधिक पुरस्कार मिळाले आहेत. तर दीपमाला खडके या जळकोट येथे सहशिक्षिका पदावर कार्यरत असून सुप्रसिद्ध कवयित्री आहेत. त्यांनाही अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून नवोदय व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी त्यांनी घडविले आहेत. या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

DAY उस्मानाबाद गुरुवार, १२ डिसेंबर २०१९



अणदूर (ता. तुळजापूर) : जवाहर महाविद्यालयात आयोजित रसायनशास्त्र चर्चासत्राचे उद्घाटन करताना शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश वडगावकर. यावेळी माजी आमदार सिद्रामप्पा आलुरे गुरुजी, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी आदी.

# रसायनशास्त्र हा जीवनाचा अविभाज्य घटक

## डॉ. प्रकाश वडगावकर : जवाहर महाविद्यालयात चर्चासत्र

**अणदूर, ता. ११ (बातमीदार)** : रसायनशास्त्राशिवाय विश्व तर विश्वामध्ये रसायनशास्त्राशिवाय काही असू शकत नाही. म्हणून रसायनशास्त्र हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक असल्याचे मत शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश वडगावकर (पुणे) यांनी व्यक्त केले आहे.

येथील जवाहर महाविद्यालयात आयोजित रसायनशास्त्र चर्चासत्राचे उद्घाटन बुधवारी (ता. ११) डॉ. वडगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या षष्ट्यब्दीनिमित्त वर्षानिमित्त जवाहर महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्या वतीने इमर्जिंग ट्रेंड्स इन केमिस्ट्री : स्कोप अ‍ॅन्ड फ्युचर या विषयावर विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. शास्त्रज्ञ डॉ. वडगावकर, प्रा. डॉ. अजित फडकुले (सोलापूर), ज्योती तरंगे या प्रमुख मार्गदर्शकांसह प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम. एम. लंगडे आदी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना इनप्लांट ट्रेनिंग व इंडस्ट्रियल प्लेसमेंट याही विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. फडकुले यांनी रसायनशास्त्रातील संकल्पना सुस्पष्ट करून सांगितल्या तर ज्योती तरंगे यांनी विद्यार्थ्यांना नोकरी मिळविण्यासाठी लागणाऱ्या सॉफ्ट स्किलसंदर्भात मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थिनी स्नेहा शिंदे हिने सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. विश्वास माने यांनी आभार मानले. चर्चासत्रासाठी कार्यशाळेचे समन्वयक डॉ. अमोल पाचपिंडे आणि डॉ. डी. एन. गटलेवार आदींनी पुढाकार घेतला.

सोलापूर, शुक्रवार, १३ डिसेंबर २०१९ उस्मानाबाद संचार

# रसायनशास्त्र हे जीवनाचा अविभाज्य घटक

## जवाहर महाविद्यालयात रसायनशास्त्र चर्चासत्रास प्रतिसाद

**संचार वृत्तसेवा**

**अणदूर, दि. १२-** रसायनशास्त्राशिवाय विश्व तर विश्वामध्ये रसायनशास्त्राशिवाय काही असू शकत नाही. म्हणून रसायनशास्त्र मानवी जीवनाचा अविभाज्य घटक असल्याचे मत थोर शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश वडगावकर यांनी व्यक्त केले. ते अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात आयोजित रसायनशास्त्र चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संस्थेच्या षष्ट्यब्दी वर्षानिमित्त जवाहर महाविद्यालयात 'इमर्जिन्ग ट्रेंड्स इन केमिस्ट्री : स्कोप अँड फ्युचर' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश वडगावकर, तज्ज्ञ प्रा. डॉ. अजित फडकुले, फंटासी टेक्नॉलॉजीच्या ज्योती तरंगे याप्रमुख मार्गदर्शकांसह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम. एम. लंगडे यांचीही व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना



'इनप्लांट ट्रेनिंग' व 'इंडस्ट्रियल प्लेसमेंट' याही विषयावर मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले डॉ. अजित फडकुले यांनी रसायनशास्त्रातील संकल्पना सुस्पष्ट करून सांगितल्या तर ज्योती तरंगे यांनी विद्यार्थ्यांना नोकरी मिळविण्यासाठी लागणाऱ्या सॉफ्टस्किल संदर्भात मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र घेणारे जवाहर हे पहिले महाविद्यालय ठरले. या चर्चासत्रात तुळजापूर, उमरगा, लोहारा, उस्मानाबाद तालुक्यासह सोलापूर, लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहभागी झालेल्या विविध महाविद्यालयातील व परिसरातील रसायनशास्त्र विषयाच्या पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची या चर्चासत्रास मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी, संस्थेचे सचिव सि. ना. आलुरे गुरुजी यांनी आपल्या मार्गदर्शनात परिसरातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण पूर्ण व्हावे, यासाठी आपल्या महाविद्यालयाची स्थापना केली असून महाविद्यालयात आयोजित केलेल्या विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन अशा उपक्रमाचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले. एकदिवसीय चर्चासत्र कार्यक्रमाचे प्रास्ताविक जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. सूत्रसंचालन महाविद्यालयातील विद्यार्थिनी स्नेहा शिंदे हिने केले. तर प्रा. डॉ. विश्वास माने यांनी आभार मानले. हे चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील या कार्यशाळेचे समन्वयक डॉ. अमोल पाचपिंडे आणि डॉ. डी. एन. गटलेवार यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

तरुण भारत सोमवार, दि. ३० डिसेंबर २०१९

# जीवनात कष्ट केल्याशिवाय यशप्राप्ती नाही- मा.कुलगुरू इरेश स्वामी


## जवाहरच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे थाटात उद्घाटन

**वार्ताहर**

**अणदुर, २९ डिसेंबर :** कष्ट हेच भांडवल, कष्ट केल्याशिवाय यश मिळत नाही,कुठल्याही क्षेत्रात पुढे जाता येत नाही. आळस हा एक नंबरचा शत्रू आहे युवकांनी या वयात नियोजन करून अभ्यास केल्यास जीवनात प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही. केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे या उक्तीप्रमाणे कष्टाला खूप महत्त्व आहे असे मत सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ.इरेश स्वामी यांनी व्यक्त केले ते बारूळ येथे जवाहर महाविद्यालयाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर संचलित जवाहर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अणदूर आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे बारुळ (ता.तुळजापूर) येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा वार्षिक शिबिराचे उद्घाटन झाले. हे शिबिर पर्यावरण संवर्धनासाठी युवा या विषयावर आहे. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार तथा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सि.ना.आलुरे गुरुजी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक गो.का. बिचे, श्री.वट्टे , मुख्याध्यापक पी.के. कुलकर्णी त्याचबरोबर माजी सरपंच बाबुराव ठोंबरे, बाबुराव वट्टे, सरपंच शिवाजी सुपणार, नबीलाल चाचा शेख, मुख्याध्यापक प्रा. विवेकानंद स्वामी, आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांची व्यासपीठावर विशेष उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. स्वामी म्हणाले, गीतेचा संदेश आत्मसात



करा, फळाची अपेक्षा न करता काम करा, आई-वडील आणि गुरुची निष्ठा ठेवा, बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले हे आदर्श ठेवून महात्मा गांधी, पुज्य साने गुरुजी, आचार्य विनोबांचे विचार आत्मसात करा असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना माजी आ. सि.नां.आलुरे गुरुजी म्हणाले, जीवनात शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिक्षणाशिवाय पर्याय नाही ही एक अशी संपत्ती आहे त्याची कोणीही चोरी करू शकत नाही. म्हणून शिक्षण घ्या, शिबिराच्या माध्यमातून एकत्र येऊन सेवा करा, परिस्थितीचा आणि परिसराचा अभ्यास करा. ज्या पुणे शहरात सावित्रीबाईंचा अपमान झाला त्याच विद्यापीठाला आज सावित्रीबाई फुले यांचं नाव दिलेल आहे. कष्टाचे चीज झाल्याशिवाय राहणार नाही म्हणून कष्ट करत रहा, असे सांगितले

या उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. त्यांनी आपल्या मनोगतात आज पर्यंत महाविद्यालयाच्या माध्यमातून आणि राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून केलेल्या विविध कामांची आणि उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.मल्लिनाथ बिराजदार व आभार जिल्हा समन्वयक प्रा.सुर्यकांत आगलावे यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. राठोड जी.टी.यांच्यासह प्रा.कंबार प्रा. राठोड, प्रा.सुरेश ठोंबरे प्रा.डॉ.भारती एस.आर, प्रा.प्रस कंदले यांनीही परिश्रम घेतले. कार्यक्रमावेळी बारूळ येथील आणि माजी सरपंच, ग्रामपंचायत मधील समित्यांचे पदाधिकारी व सदस्य यांच्यासह ग्रामस्थ आणि जवाहर महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

SMART उस्मानाबाद | शुक्रवार,१३ डिसेंबर २०१९

पुण्यनगरी

**In Short**

## जवाहर महाविद्यालयाच्या चर्चासत्रास प्रतिसाद



अणदूर : तुळजापूर तालुक्यातील अणदुर येथील जवाहर महाविद्यालयात आयोजित रसायनशास्त्र चर्चासत्र कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाला. कार्यक्रमास शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश वडगावकर, प्रा. अजित फडकुले, ज्योती तरंगे, प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, डॉ. एम. एम. लंगडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. या चर्चासत्रात सोलापूर, लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संस्था सचिव सि. ना. आलुरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. चनशेट्टी, सुत्रसंचालन स्नेहा शिंदे तर प्रा. डॉ. विश्वास माने यांनी आभार मानले. चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी कार्यशाळेचे समन्वयक डॉ. अमोल पाचपिंडे, डॉ. डी. एन. गटलेवार यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

लोकमत | औरंगाबाद, शुक्रवार, दि. १३ डिसेंबर २०१९

## छायांकित वृत्त...



अणदूर येथे रसायनशास्त्र विषयावरील कार्यशाळेचे उद्घाटन करताना शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश वडगावकर, संस्था सचिव सि. ना. आलुरे गुरुजी आदी.

### रसायनशास्त्र विषयावर चर्चासत्र

अणदूर : येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्या वतीने बुधवारी विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय चर्चासत्र घेण्यात आले. यावेळी पुणे येथील शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश वडगावकर, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सि. ना. आलुरे गुरुजी, तज्ज्ञ प्रा. डॉ. अजित फडकुले, संगमेश्वर कॉलेज (सोलापूर), जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चन्शेट्टी, रसायन विभाग प्रमुख प्रा. डॉ. मल्लीनाथ लंगडे, प्रा. डॉ. ए. एम. पाचपिंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. टेक्नॉलॉजीच्या ज्योती तरंगे यांनी 'इन प्लांट ट्रेनिंग' व 'इंडस्ट्रियल प्लेसमेंट' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी उमरगा, गुंजोटी, नळदुर्ग, तुळजापूर, उस्मानाबाद, अक्कलकोट या ठिकाणाहून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्रास्ताविक डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी तर सूत्रसंचालन स्नेहा शिंदे यांनी केले.

दिव्य मराठी उस्मानाबाद, रविवार, १५ डिसेंबर २०१९

# विद्यार्थ्यांना रसायनशास्त्रातील संधीसह नोकरीसाठीच्या कौशल्यबाबत मार्गदर्शन

## चर्चासत्रात राष्ट्रीय ख्यातीच्या संशोधकांचे लाभले मार्गदर्शन

प्रतिनिधी | अणदूर

येथील जवाहर महाविद्यालयात 'इमर्जिना ट्रेंड्स इन केमिस्ट्री: स्कोप अँड फ्युचर' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय चर्चासत्र घेण्यात आले. चर्चासत्रात पुणे येथील राष्ट्रीय रसायनशास्त्र प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश वडगावकर यांनी मार्गदर्शन केले. रसायनशास्त्र मानवी जीवनाचा अविभाज्य घटक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या षष्ठ्यब्दी वर्षानिमित्त जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्या वतीने बुधवारी (दि.११) चर्चासत्रात डॉ. वडगावकर यांच्यासह सोलापूर येथील संगमेश्वर कॉलेजचे प्रा. अजित फडकुले, फंटासी टेक्नॉलॉजीच्या ज्योती तरंगे हे प्रमुख मार्गदर्शक होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम. एम. लंगडे व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन चर्चासत्राचे उद्घाटन झाले. यावेळी प्रमुख मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना 'इन प्लांट ट्रेनिंग व इंडस्ट्रियल प्लेसमेंट' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे डॉ.अजित फडकुले यांनी रसायनशास्त्रातील संकल्पना स्पष्ट करुन सांगितल्या तर ज्योती तरंगे यांनी विद्यार्थ्यांना नोकरी मिळविण्यासाठी लागणाऱ्या सॉफ्ट स्किल संदर्भात मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र घेणारे जवाहर हे पहिले महाविद्यालय ठरले. चर्चासत्राचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी तर सूत्रसंचालन विद्यार्थिनी स्नेहा शिंदे हिने केले, प्रा. डॉ. विश्वास माने यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी समन्वयक डॉ. अमोल पाचपिंडे, डॉ. डी. एन.गटलेवार यांच्यासह तासिका तत्वावरील प्राध्यापक व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.



'इमर्जिना ट्रेंड्स इन केमिस्ट्री या विषयावर व्याख्यानास मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## तुळजापूर, उमरगा, लोहारा, उस्मानाबाद, सोलापूर, लातूर येथील विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांची उपस्थिती

या चर्चासत्रात तुळजापूर, उमरगा, लोहारा, उस्मानाबाद तालुक्यासह सोलापूर, लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संस्थेचे सचिव सि. ना.आलुरे गुरुजी यांनी परिसरातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण पूर्ण होण्यासाठी महाविद्यालय स्थापन केले असून आयोजित उपक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन केले.

नाबाद : शुक्रवार, दिनांक २७ डिसेंबर २०१९

पुरोगामी वि
एक

# बारुळ येथे जवाहर विद्यालयाचे शनिवारपासून युवा शिबिर

**अणदूर :** येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अणदूर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने तुळजापूर तालुक्यातील बारुळ येथे २८ डिसेंबर ते ३ जानेवारी या कालावधीत पर्यावरण संवर्धनासाठी युवा शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

## कुलगुरू डॉ. स्वामी यांच्या हस्ते होणार उद्घाटन

या शिबिरात महाविद्यालयीन विद्यार्थी- विद्यार्थिनी, प्राध्यापक व बारूळ ग्रामस्थ सहभागी होत असून या शिबिराचे उदघाटन सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार सौदागर तांदळे हे उपस्थित राहणार आहेत. माजी आ. सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराचे उदघाटन होणार आहे. शिबिरामध्ये ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संवर्धन, श्रमदान, महिला मेळावा, शेतकरी मेळावा, वनराई बंधारा, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, आरोग्य शिबीर, समाज व युवक प्रबोधन, पशुचिकित्सा शिबिर या व अशा प्रकारची अनेक उपक्रमांनी हे शिबिर घेण्यात येत आहे.

फ्रमामध्ये प्रा. डॉ. संतोष पवार, पं. स. सभापती शिवाजीराव गायकवाड, प्रा. किरण सगर, प्रा. डॉ. शीला स्वामी, एस. एल. सूर्यवंशी यांची व्याख्याने होणार आहेत. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या मार्गदर्शनानुसार राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे उस्मानाबाद जिल्हा समन्वयक प्रा. एस. डी. आगलावे आणि कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. जी. टी. राठोड हे या शिबिराचे व्यवस्थापन करत आहेत.

बाद | सोमवार,१६ डिसेंबर २०१९ पुण्य

उपस्थित होते.

# जवाहर विद्यालयात मुळे, पिंजारी यांचा सत्कार



अणदुर: तुळजापूर तालुक्यातील अणदुर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील नेहा नागनाथ मुळे व रिझवाना महंमद पिंजारी या दोन विद्यार्थिनींची राष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. हे प्रशिक्षण दिल्ली येथे एन. आय.यु.एस.अंतर्गत देशभरातील टॅलेंटेड विद्यार्थ्यांसाठी देण्यात येते. विशेष म्हणजे या प्रशिक्षणासाठी मराठवाड्यात दोन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून ते दोन्ही विद्यार्थी अणदुर येथील जवाहर विद्यालयातीलच आहेत. या विद्यार्थीनींचा शास्त्रज्ञ डॉ.प्रकाश वडगावकर, सि.ना.आलुरे व प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते सत्काराने गौरव करण्यात आला.

पुढारी
संपादकीय
मार्गशीर्ष कृ. ५, शके १९४१, श्री शिवशक ३४६
औरंगाबाद, सोमवार, १६ डिसेंबर २०१९

# मुळे, पिंजारी यांची प्रशिक्षणासाठी निवड




**अणदूर, प्रतिनिधी :** येथील शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर संचलित जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील दोन विद्यार्थिनींची होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र येथे एनआययूएस अंतर्गत प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे.

देशभरातील टॅलेंटेड विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण देण्यात येत असून यासाठी भारतातून ३० विद्यार्थ्यांची निवड झाली असून यामध्ये मराठवाड्यातून दोन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. विशेष म्हणजे या दोन्ही विद्यार्थिनी अणदूर (ता.तुळजापूर) येथील जवाहर महाविद्यालयातील आहेत. या महाविद्यालयात बीएस्सी प्रथम वर्षात शिकत असलेल्या मुळे नेहा नागनाथ आणि पिंजारी रिझवाना महंमद या विद्यार्थिनी असून याना थोर शास्त्रज्ञ डॉ.प्रकाश वडगावकर (एनसीएल पुणे), सोलापूर येथील संगमेश्वर महाविद्यालयाचे प्रा.डॉ. अजित फडकुले संस्थेचे सचिव सि.ना.आलुरे गुरुजी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांच्याहस्ते गौरविण्यात आले.

मुंबई येथील होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रात २३ ते ३० डिसेंबर या कालावधीसह यापुढील प्रशिक्षणाच्या नियोजित कालावधीमध्ये चालणाऱ्या या प्रशिक्षणामध्ये मूलभूत संशोधन कसे करावे, संशोधनाची आवड निर्माण व्हावी, मूलभूत संशोधनाचे कौशल्य अवगत व्हावे यासह इतरही महत्त्वपूर्ण वैज्ञानिक माहिती देण्यात येणार आहे.

निवडीबद्दल महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

रविवार, दिनांक १५ डिसेंबर २०१९
एकम
१०
epaper
ww.dainikekmat.com

## महत्त्वाचे

# मराठवाड्यातून जवाहरच्या २ विद्यार्थिनींची निवड.



**अणदूर :** येथील शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर संचलित जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील दोन विद्यार्थिनींची टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च संचलित होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र येथे एन.आय.यु.एस.अंतर्गत देशभरातील टॅलेंटेड विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण देण्यात येत असून यासाठी भारतातून ३० विद्यार्थ्यांची निवड झाली. मराठवाड्यातून दोन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. विशेष म्हणजे या दोन्ही विद्यार्थिनी अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील आहेत. या महाविद्यालयात बी. एस्सी. प्रथम वर्षात शिकत असलेल्या कु. मुळे नेहा नागनाथ आणि कु.पिंजारी रिझवाना महंमद या विद्यार्थिनी असून याना थोर शास्त्रज्ञ डॉ.प्रकाश वडगावकर येथील संगमेश्वर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अजित फडकुले संस्थेचे सचिव सि. ना. आलुरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्याहस्ते गौरविण्यात आले. मुंबई येथील होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रात २३ ते ३० डिसें. या कालावधीसह यापुढील प्रशिक्षणाच्या नियोजित कालावधीमध्ये चालणाऱ्या या प्रशिक्षणामध्ये म ूलभूत संशोधन कसे करावे, संशोधनाची आवड निर्माण व्हावी, मूलभूत संशोधनाचे कौशल्य अवगत व्हावे यासह इतरही महत्वपूर्ण वैज्ञानिक माहिती देण्यात येणार आहे. या निवडीबद्दल महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

उस्मानाबाद | सोमवार,३० डिसेंबर २०१९ पुण्य

# बारुळ येथील शिबिराचे माजी कुलगुरू स्वामींच्या हस्ते उद्घाटन



पुण्य नगरी। वृत्तसेवा

**बारुळ :** तुळजापूर तालुक्यतील बारुळ येथे शनिवारी (दि.२८)जवाहर कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय अणदूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिबीर घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू इरेश स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार सि. ना. आलूरे, जी. के बिच्चे, सरपंच शहाजी सुपणार, बाबुराव ठोंबरे, सुभाष पाटील, व्ही. शिवराम वट्टे, राजकुमार वट्टे, बाबुराव वट्टे, प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, विवेकानंद स्वामी, पी.के कुलकर्णी उपस्थित होते. हे शिबीर ३ जानेवारी पर्यंत चालणार असून शिबिरामध्ये पर्यावरण संवर्धन, ग्राम स्वच्छता, समाज प्रबोधन, कृषी माहिती आदी विषयावर चर्चा व माहिती दिली जाणार आहे. यावेळी कुलगुरू इरेश स्वामी यांनी सेवा योजना शिबिराचे महाविद्यालयीन जीवनातील महत्व याविषयीची माहिती दिली. तसेच अशा शिबिरांच्या माध्यमातून जीवनात कष्ट करण्याची प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. याप्रसंगी नबीलला शेख, कमलाकर ठोंबरे, बाबुराव व्होर्टे, नटराज ठोंबरे, दत्तात्रय सगर, शिवलिंग ठोंबरे, प्रा. एस. डी. आगलावे,प्रा. एस. एस. ठोंबरे, जी. टी. राठोड, श्रीमती भरती मॅडम, श्रीमती एस. एन. कबाडे, राजेंद्र हजारे, जयप्रकाश वट्टे, तानाजी रणदिवे यांच्यासह बाळेश्वर विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.